सातवे एडवर्ड बादशाह
यांचे अल्प-चरित्र

King-Emperor Edward VII.

"THE PEACEMAKER."

A MARATHI PEN-PORTRAIT

BY

A. B. BARIDE.

Member King-Edward Memorial Fund Pusesavli
District Satara."

FIRST EDITION 1000 Copies.

BOMBAY.

Printed by B. R. Ghanekar, at the N. S. Press,
3, Kolbhat Lane, Bombay, for the Publisher.

1911.

Cloth Binding Annas 8.
Paper Do. Annas 4.

''

खान्यांत

हेत.)

सार्वभौम राजाधिराज

सातवे एडवर्ड बादशाह

अथवा

"शांतिस्थापक"

यांचें अल्प चरित्र.

हा ग्रंथ मि. हॉलकेनसाहेब यांच्या

"Pen Portrait" या ग्रंथाधारें

आत्माराम बापूजी बरिदे

"मेंबर किंग एडवर्ड मेमोरियल फंड पुसेसावळी"

ता. खटाव जिल्हा सातारा

यांनीं रचिला.

तो

मुंबईंत

कोलभाटगली घर. नं. २३ येथें निर्णयसागर छापखान्यांत

वा. रा. घाणेकर यांजकडून छापवून

प्रसिद्ध केला.

कापडी बाइंडिंग किंमत ८ आणे.

कागदी बाइंडिंग किंमत ४ आणे.

या ग्रंथाचा छापण्याचा खर्च वजा जातां, सर्व द्रव्य पुसेसावळी येथील "खटाव तालुका किंग एडवर्ड मेमोरियल" या नांवाचें जें **गरिबांकरितां** वसतिगृह होणार आहे तें बांधण्यास **धर्मार्थ दिलें जाईल.**

Printed by B. R. Ghanekar at the "Nirnaya-Sagar"
Press, 23 Kolbhat lane, Kalbadevi Road,
Bombay, for the Publisher.

Published by Atmaram Bapuji Baride
Pusesavli, Taluka Khatav, Dr. Satara.

अर्पणपत्रिका.

आमचे परमपूज्य, आणि प्रिय गुरुवर्य,
मेहेरबान आर्. डी. प्रायर, एम्. ए.
साहेबबहादूर,

जे पूर्वी पुणें हायस्कूलचे हेडमास्तर होते, आणि
हल्लीं मध्यभागचे एज्युकेशनल् इन्स्पेक्टर आहेत,

ह्यांच्या कर्तव्यदक्षतेस, विद्वत्तेस, दयाळूपणास,
आणि प्रेमळ सौजन्यास लुब्ध होऊन हा
ग्रंथ त्यांस मीं अत्यंत आदर व सन्मान-
पूर्वक त्यांच्या परवानगीनें अर्पण
केला आहे.

आत्माराम बापूजी बरिदे,
ग्रंथकर्ता.

OPINIONS.

I read with great pleasure the little book "King Emperor Edward VII the Peacemaker" written in Marathi by A. B. Baride Sub-Assistant Surgeon, Pusesavli. In the introductory part he has given the substance of His Majesty's life in a very plain and interesting manner. His attempt to translate into Marathi "the pen portrait of King Edward, a prince and a great man" by *Mr*. Hall Caine is, in my opinion a pretty good success considering the difficulty of rendering into simple Marathi the rhetorical style of *Mr*. Hall Caine. The book is compiled in a highly loyal strain and I think it will be a good reading for boys and villagers.

(Sd.) R. K. KULKARNI M. A., LL. B.
PROFESSOR OF HISTORY,
Victoria College,
GWALIOR.

Pusesavli,
3-6-11.

"You have rendered a very valuable service to the Marathi knowing public by translating into Marathi the substance of the "Pen Portrait" by Mr. Hall Caine, of the late most Gracious Majesty, King Edward VII, Emperor of India, whose name is a household word in every family in India. Your rendering into Marathi is simple and easy and is, therefore such as can be understood without the least trouble even by an ordinary Marathi-knowing person. The book is very instructive and is such as should be preserved by every person and in every family."

(Sd.) D. S. SAPRE B. A., LL. B.
1ST CLASS SUB-JUDGE,
BIJAPUR.

Bijapur,
4-6-11.

रा. रा. आत्माराम बापूजी बरिदे यांनीं आमचे परमपूज्य आणि दयाळू सार्वभौम बादशाह **सातवे एडवर्ड** यांचें जें अल्प चरित्र लिहिलें आहे तें मीं वाचून पाहिलें. मजला तें मनोरंजक व बोधप्रद वाटलें. त्याजबद्दल माझे मनास फार आनंद झाला! या पुस्तकांतील भाषा सरळ व सोपी आहे. पुसेसावळी येथें होणारे "एडवर्ड महाराजांचे स्मारकास" त्यांनीं या पुस्तकाचें होणारें उत्पन्न उदार मनानें देण्याचें कबूल केलें त्याजबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

तारीख २८ फेब्रुवारी सन १९११ इसवी.

दामोदर कृष्ण अयाचित.
गांवमुनसिफ व कन्सिलिएटर व स्मारक कमेटी मेंबर,
पुसेसावळी.

रा. रा. आत्माराम बापूजी बरिदे यांनीं माजी सार्वभौम बादशाह यांचें जें अल्प चरित्र लिहिलें आहे तें मीं समग्र वाचिलें. पुस्तकांतील मजकूर चांगला बोधप्रद असून आबालवृद्धांस पुस्तक वाचण्यास चांगलें **उपयोगीं** पडण्यासारखें आहे. हें पुस्तक त्यांनीं अश्रांत परिश्रम करून लोकहितार्थ प्रसिद्ध केलें, त्याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करितों. पुस्तकांतील मजकूर पूर्ण राजनिष्ठावंत आहे, यांत तिळमात्र संशय नाहीं.

दिगंबर तुकाराम कांचन,
कॉन्ट्रॅक्टर.

रा. रा. आत्माराम बापूजी बरिदे यांनीं आमचे परलोकवासी, अत्यंत दयाळू हिंदुस्तानचे बादशाह सातवे एडवर्ड यांचें जें अल्प चरित्र लिहिलें तें मीं समग्र वाचिलें. पुस्तकांतील मजकुराची जुळणी **सुबोध** आणि **मनोरंजक** झाली आहे. या पुस्तकाचे वाचनानें मनावर राजनिष्ठतेचा अतिउत्तम ठसा उमटतो यांत शंका नाहीं. पुस्तक संग्रहास फारच योग्य आहे. प्रत्येक राजनिष्ठ मनुष्यानें या पुस्तकाची एक प्रत संग्रहीं ठेवणें अत्यंत जरूर आहे.

श्रीजयरामस्वामींचें वडगांव.
तारीख २६ मार्च सन १९११ इ०.

गोपाळ रामचंद्र अयाचित.

रा. रा. आत्माराम बापूजी बरिदे यांनीं लिहिलेलें सार्वभौम बादशाह सातवे एडवर्ड यांचें चरित्र आम्हीं वाचिलें. तें आम्हांस चांगलें वाटलें. आजपर्यंत मराठींत हें चरित्र प्रसिद्ध झालें नव्हतें. ती उणीव या पुस्तकानें भरून आली आहे. मराठी वाचकांस या महाभाग्यशाली बादशाहाचे चरित्राचे वाचनानें अत्यंत **संतोष** व **उल्हास** होणार आहे. या पुस्तकास कमिटीची पूर्ण सहानुभूति आहे. ग्रंथकर्ते हे ह्या स्मारककमिटींतील मेंबर असून ते या पुस्तकापासून होणारें उत्पन्न पुसेसावळी एथील "किंग् एडवर्ड स्मारकफंडास" देणार आहेत हें फार स्तुत्य आहे.

पुसेसावळी तारीख
१ एप्रिल सन १९११ इ०.

विष्णु पांडुरंग अयाचित,
चेअरमन स्मा० क०.

खेमचंद भगवानदास गुजर,
मेंबर स्मा० क०.

गणेश मल्हार कुळकर्णी,
मेंबर आणि सेक्रेटरी, मेमोरियल कमेटी पुसेसावळी.

ग्रंथकर्त्याची प्रस्तावना.

आपले परमपूज्य, आणि अत्यंत **दयाळू** सार्वभौम राजाधिराज सातवे एडवर्ड बादशाह यांचे चरित्रांचीं कांहीं पुस्तकें इंग्रजींत प्रसिद्ध झालीं आहेत, तीं माझे अवलोकनांत आलीं. आणि तशाच प्रकारचा एकादा तरी ग्रंथ मराठी भाषेंत प्रसिद्ध व्हावा, असें मला वाटलें म्हणून हा ग्रंथ मी प्रसिद्ध करित आहें. कारण तीं पुस्तकें अत्यंत मनोहर व बोधपर आहेत.

परलोकवासी बादशाह सातवे एडवर्ड यांचें त्रोटक चरित्र मिस्तर हॅालकेन साहेब यांनीं इंग्रजींत प्रसिद्ध केलें आहे. त्या पुस्तकाचें भाषांतर करण्याची परवानगी मीं त्यांस मागितली, ती त्यांनीं मला मोठ्या खुषीनें व **उदार** मनानें लागलीच दिली, याबद्दल मी त्यांचा कृतज्ञतापूर्वक अत्यंत **आभारी व ऋणी** आहें. त्यांच्या पुस्तकांतील मुद्यांस अनुसरून हा ग्रंथ मीं रचिला आहे.

ज्यांना सर्व जग **स्तुतिपूर्वक धन्य धन्य म्हणत** आहे, व ज्यांनीं आपला देह आपले **प्रजेचे कल्याणाकरितां व जगांत शांतता स्थापण्याकरितां सतत रात्रंदिवस झिजविला** त्यांच्या चरित्राची माहिती मीं अत्यंत राजनिष्ठापूर्वक मराठी वाचकांस या अल्प ग्रंथाधारें करून दिल्यांत, मीं आपलें पवित्र कर्तव्यकर्म चांगल्या तऱ्हेनें केलें आहे, यांत मला अभिमान वाटत आहे. यांत याहून दुसरें कांहींएक नाहीं.

हें चरित्र चांगलें बोधपर आहे. याची भाषा आबालवृद्धांस सहज समजावी, अशी मीं यथामति सोपी केली आहे. या पुस्तकाचे कामीं रा. रा. दत्तात्रय बाबुराव अत्रे, **हेडमास्तर** पुसेसावळी यांनीं जी मदत केली त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. तसेंच रा. रा. गणेश मल्हार कुळकर्णी यांनीं पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या त्यांजबद्दल मी त्यांचाही फार आभारी आहें. त्याप्रमाणेंच बालबोध मासिक पुस्तकांतील कांहीं आंकड्यांची वगैरे मदत घेण्याची **परवानगी** दिली म्हणून सदरहू पुस्तकांचे प्रकाशक व मालक यांचाही मी अत्यंत आभारी आहें.

पुसेसावळी,
तारीख १०-१-११.

आ. बा. बरिदे.



सार्वभौम राजाधिराज सातवे एडवर्ड बादशाह.

सार्वभौम राजाधिराज सातवे एडवर्ड बादशाह यांचे चरित्राचा

उपोद्घात.[1]

सार्वभौम राजाधिराज सातवे एडवर्ड बादशाह यांचे पुढील चरित्राचा इतिहास.

ह्यांचें जन्म तारीख ९ माहे नोव्हेंबर सन १८४१ इसवी रोजीं लंडन शहरांतील बकिंगहाम राजवाड्यांत झालें. त्या वेळेस अत्यानंदाचे घंटानाद सुरू झाले. तोफेच्या मोठ्या आवाजानें सर्व शहर दणाणून गेलें, सर्व शहरांत **अत्यानंद** प्रदर्शित करण्यांत आला.

राजवाड्यांत नामांकित प्रधान व सरदारमंडळी, तसेंच कित्येक सुइणी आणि वैद्य यांना अगोदरच बोलाविलें होतें. त्यांत वॉटर्लूचे प्रसिद्ध योद्धे थोरले **ड्यूक ऑफ् वेलिंग्टन** हेही आले होते.

जन्मल्यावर तें महाभाग्यशाली बालक, एका प्रशस्त रौप्यपात्रांत घालून जमलेल्या मंडळीस मिसेस लिलीबाई यांनीं दाखविण्याकरितां आणिलें. त्यांजकडे पाहून " **मुलगा** आहे काय" असें ड्यूक आफ् वेलिंगटन यांनीं विचारिलें. त्यांस "महाराज, **राजपुत्र** आहे" असें मिसेस लिलीबाईनीं सांगितलें. तें ऐकून आपले हातून प्रमाद घडला असें त्यांस वाटून ते स्तब्ध झाले.

राजपुत्र जन्मल्याचें प्रसिद्ध करण्याकरितां ती गोष्ट कागदावर नीट लिहून तो कागद राजवैद्यांच्या सह्यांनिशीं बाहेर चिकटविला. महाराणी

---

१ हा भाग मि० **हॉलकेनसाहेब** यांचा ग्रंथ व बालबोध मासिक-पुस्तकाच्या आधारें लिहिला आहे. त्याबद्दल त्यांचे आभार आहेत.

व्हिक्टोरिआ या अत्यंत **दयाळू** आणि **परोपकारी** होत्या. यांचेवर सर्व प्रजेची फार भक्ति होती. ब्रिटिश तक्तास **युवराज** झाल्याचें ऐकून प्रजाजनांची भक्ति त्यांचे ठिकाणीं अधिकच वृद्धिंगत झाली. आणि प्रजाजनांनीं **सर्वत्र अत्यानंद** व्यक्त केला. राजपुत्र एक महिन्याचे झाल्यावर त्यांस **प्रिन्स ऑफ् वेल्स** ही पदवी दिली; व त्यांना मुगुट घालून त्यांचे मृदु अंगुलींत मुद्रिका घातली.

तारीख २५ जानेवारी सन १८४२ इसवी रोजीं त्यांना **ख्रिस्ती धर्मदीक्षा** सेंट जार्ज चापलमध्यें देण्यांत आली. हा समारंभ मोठा प्रेक्षणीय होता. त्यांचें नांव ऑलबर्ट एडवर्ड असें ठेवून, त्यांचे धर्मपिते प्रशिया देशाचे राजे फ्रेडरिक विलियम झाले होते.

राजपुत्र एडवर्ड यांचे लाड न करितां त्यांना साधारण मुलाप्रमाणें वाढविण्यांत आलें. हे दिसण्यांत हुषार व तरतरीत असत. त्यांची शरीरप्रकृति निकोप व सुदृढ असून, डोळे पाणीदार होते. त्यांची मुद्रा अत्यंत **आल्हादकारक** असून गंभीर दिसत असे. त्यांना खेळण्याचा फार नाद असे. त्यांचा सर्वांत आवडीचा खेळ ह्मटला ह्मणजे लटकी लढाई हा होय. त्यांचें लहानपणच्या मित्रांवर फार प्रेम असे. **नाट्यकला** त्यांना विशेष आवडत असे. राजपुत्र जसजसे मोठे होत चालले, तसतसें त्यांना नानाप्रकारच्या वस्तूंचें ज्ञान करून देऊन भव्य आणि सुंदर देखावे दाखविण्याचा क्रम सुरू ठेविला.

एके प्रसंगीं त्यांना एका शोभिवंत नौकेंत बसवून बंदराचा व लोकसमुदायाचा प्रेक्षणीय देखावा दाखविला. राजपुत्र हे लहानपणापासून **बुद्धीनें तीव्र, चलाख, समयोचित उत्तर देण्यांत आणि बोलण्यांत हुशार असत.** त्यांचें लहानपण नुसतें खेळण्यांत जाऊं दिलें नाहीं. त्यांचे शिक्षणासंबधानें त्यांचे वडील आणि मातोश्री यांनीं फार मोठी काळजी घेतली. प्रथम लेडी लिट्लटन यांना त्यांचे शिक्षक

नेमण्यांत आलें. त्यांनीं तें काम राजपुत्र दहा वर्षांचे होई तोंपर्यंत केलें. नंतर मिस्तर हेनरी बर्च यांना त्यांचे शिक्षक नेमिलें. कांहीं तरी नवीन शिकविल्यावांचून त्यांचा एकही दिवस जाऊं दिला नाहीं.

सर्वांत अगोदर **सभ्यपणा** म्हणजे काय हें त्यांना शिकविलें. हुकूम कसा करावा, तसेंच **आज्ञा कशी मानावी**, हें त्यांना शिकविलें. **कर्तव्यकर्माचें तत्व**, तसेंच **चलाखपणा** आणि **उल्हासवृत्ति** कशी ठेवावी, हें त्यांना समजावून दिलें. **परमार्थाकरितां** देह कसा झिजवावा, आणि स्वतः झीज कशी सोसावी हें त्यांना चांगलें शिकविलें. गृहस्थपणा आणि **शिष्टाचार** यांचें महत्व त्यांस सांगितलें. तसेंच राजकारस्थानही त्यांना शिकविलें. चंचल वृत्ति किंवा अस्थिरपणा यांची त्यांना यत्किंचितूही बाधा होऊं दिली नाहीं. कला आणि जगांतील आल्हादकारक वस्तूही, त्यांना दाखविल्या. त्यांची शिक्षण-पद्धति कलेचें व शिक्षणाचें महत्व त्यांना समजावें अशी ठेविली होती. निरोगी आणि आनंदानें आयुष्य कसें घालवावें, हें त्यांना शिकविलें. त्यांची शिक्षणपद्धति कडक होती, परंतु रहाणी सुखाची होती. मिस्तर बर्च यांनीं शिक्षकाचें काम इ. स. १८५१ त सोडल्यावर मि० गिब्स यांना त्या कामावर नेमिलें.

नंतर त्यांना एडिंबरो विश्वविद्यालयांत नाना प्रकारच्या कला आणि व्यापार यांची माहिती दिली. ऑक्सफोर्ड विश्वविद्यालयांत त्यांना इंग्लंडचा इतिहास प्रोफेसर गोल्डविन स्मिथ शिकवित. रसायनशास्त्र सर बेंजामिन बोर्डी आणि प्रोफेसर बाकर हे तत्त्वज्ञान शिकवित.

तारीख ९ माहे नोव्हेंबर १८५९ इसवी रोजीं त्यांचा अठरावा **वाढदिवस** होता. त्या दिवशीं त्यांना महाराणी विक्टोरिआ यांचे कडून, एक मोठें पत्र आलें. त्यांत मोठ्या प्रेमानें आणि ममताळु-पणानें लिहिलें होतें कीं, “आमची शिक्षणपद्धति आपणांस फार तीव्र वाटली असेल; परंतु ती तुमच्याच कल्याणाकरितां तशी ठेविली होती.

आतां तुम्ही स्वतंत्र आहांत. आमचा किंवा आपले तीर्थरूपांचा तुमचेवर अधिकार नाहीं. आत्मस्तुतीसारखे मोहपाशांत तुम्हीं न पडावें, अशी तुमचे अंतःकरणाची तयारी केली आहे तर सांभाळून वागावें. अमुक करा असें सांगण्याचा अधिकार आमचेकडे राहिला नाहीं." हें पत्र वाचित असतां त्यांचें अंतःकरण सद्गदित होऊन त्यांचे नेत्रावाटे घळघळां **प्रेमाश्रु** वाहूं लागले. त्याच दिवशीं त्यांना राहण्यास निराळें घर देण्यांत आलें. तरी पण त्यांचेवर त्यांच्या वडिलांची नजर असे.

त्यांना पलटणींत **कर्नलचा** अधिकार दिला. नंतर त्यांचेकडून प्रवास करवून त्यांना नामांकित मोठमोठीं शहरें, लोकस्थिति, आणि देश दाखविणें हें सुरू ठेविलें. मग पुढें त्यांस "**फीलडमार्शल**" ही बहुमानाची पदवी दिली.

त्यांना प्रवासाचा मोठा शोक असे. इंग्लंडच्या वसाहती आणि सभोंवतील राज्यें यांमध्यें त्यांनीं प्रवास केला. अमेरिकेंतील कानडा प्रांतांत ते इसवी सन १८६० सालीं गेले होते. तेथील लोकांनीं त्यांचें आदरातिथ्य अति उत्तम प्रकारें केलें.

ते जर्मनींत गेले असतांना त्यांची व प्रिन्सेस अलेकझांड्रा यांची भेट झाली. पुढें त्यांचें परस्पर प्रेम जडून त्यांचा **विवाह** तारीख १० मार्च इ. स. १८६३ सालीं त्यांच्या वयाच्या बाविसावे वर्षीं झाला.

तो लग्नसमारंभ फार प्रेक्षणीय झाला. त्यास खर्च सुमारें ४५००००० रुपये लागला. ज्या राजमार्गानें पतिपत्नींची मिरवणूक गेली होती, त्या मार्गावर जमलेल्या मंडळींनीं दंपत्यावरून उधळलेल्या फुलांची रास अतोनात पडली होती. असा लग्नसोहळा कधींच कोणाचा झाला नाहीं.

इ० स० १८६५ सालीं ते **मार्लबरोहाउसची** आग विझवित असतां इमारतीचे धाब्यावरून खालीं निसरत आले, परंतु त्यांना कांहीं-एक इजा झाली नाहीं. इ० सन १८७१ त त्यांना विषमज्वराचें जिवा-

वरचें दुखणें गेलें. ते समयीं त्यांच्या पत्नीनें त्यांची सारखी रात्रंदिवस शुश्रूषा केली. त्या वेळीं त्यांनीं धर्मोपदेशकांस एक लहानसें पत्र लिहिलें. त्याचा सारांश असा—"माझे भ्रतार यांना आतां परमेश्वरकृपेंकरून किंचित् बरें आहे, म्हणून मी देवाचे प्रार्थनेस देवळांत येत आहें. परंतु त्यांच्या शुश्रूषेकरितां मला प्रार्थना संपण्यापूर्वींच, परत जावें लागेल. तरी प्रार्थनेच्या पूर्वभागांतच जर आपण त्यांच्या आरोग्याविषयीं दोन शब्द बोलाल तर मलाही प्रार्थना करण्यास बरें होईल."

युवराज या दुखण्यांतून उठल्याबद्दल राजघराण्यांतील सर्व मंडळी युवराजांसह मोठ्या आनंदानें मिरवीत देवळांत प्रार्थनेस गेली. त्या मिरवणुकींत **तीस हजार मुलें** राष्ट्रगीत गात होतीं. आणि परमेश्वराचे आभार मानण्याकरितां **तेरा हजार** लोक देवळांत प्रार्थनेस जमले होते!

इसवी सन १८७५ सालीं ते आपल्या देशांतही आले होते. त्या वेळीं लोकांनीं त्यांचा फार **गौरव** करून अति उत्तम प्रकारचें आदरातिथ्य केलें. त्यांनीं जयपूर, मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली वगैरे नामांकित मोठमोठीं शहरें पाहिलीं. त्यांची स्वारी नेपाळांतही गेली होती.

बोटींतून ते मुंबईस उतरले, तेथें त्यांना मुख्य मुख्य संस्थानिक आणि इतर प्रसिद्ध लोक भेटले. युवराज प्रत्येकाशीं मोठ्या सौजन्यानें आणि हर्षयुक्त प्रेमानें बोलत असत. तेणेंकरून सर्व संस्थानिकांना व इतर मंडळींना अत्यानंद झाला.

त्यांनीं जयपूर येथें शिकार करून प्रथम वाघ मारिला! आणि त्यानंतर त्यांनीं नेपाळांत एका दिवसांत सहा वाघांची शिकार केली! रविवारीं ते शिकार करित नसत, व तो दिवस पवित्र असा पाळीत असत.

ते आपले प्रपितामह तिसरे जार्ज ह्यांचेप्रमाणें कृषीवृत्तींत अथवा **शेतकीचे** कामांत फार निपुण होते. **सांडरिंगहाम** येथें त्यांची एक हजार एकर उत्तम प्रकारची जमीन आहे. तेथें त्यांचीं कुळें आहेत, तेथें नाना प्रकारच्या उत्तम उत्तम सुंदर घोड्यांच्या जाती, पाळींव शिकविलेलीं शोभिवंत अप्रतिम कुत्रीं, तसेंच गाई, बैल, आदिकरून नाना प्रकारच्या जातींच्या जनावरांचे त्यांचे कळप आहेत. त्या सर्वांची अति उत्तम प्रकारची बरदास्त ते ठेववीत असत. त्यांची जोपासना व वाढ करविण्याचे कामांत ते फार कुशल असत.

त्यांच्या बागेंत उत्तम उत्तम प्रकारचीं मधुर फळें ते पिकवीत असत. आणि त्यांबद्दल त्यांची फार ख्याति झालेली होती.

ते आपल्या कुळांना फार ममताळूपणानें वागवीत असत. त्यांच्या दुःखाच्या प्रसंगीं त्यांना साह्य, अडचणीचे प्रसंगीं मदत, कोणी दुखण्यांत पडल्यास औषधोपचारही करवीत असत. त्या सर्वांवर ते नेहमीं दया आणि ममता करून त्यांच्या कामांस **प्रोत्साहन** देत असत.

त्यांचीं जनावरें प्रदर्शनांत उत्तम प्रकारचीं व पहिल्या वर्गाचीं ठरून त्यांना अनेक वेळां मोठमोठालीं बक्षिसें मिळालीं होतीं.

युवराज असतांना एकंदर त्यांचें उत्पन्न सुमारें ६१०६००० पौंड होतें. त्या मानानें त्यांचा खर्चही फार होता. नुसत्या तारा आणि पोष्टाचीं पाकिटें ह्यांसच सुमारें **एक लक्ष** रुपये लागत असत.

त्यांनीं **"ऑस्पिटल फंड"** उभारिला होता. रोगग्रस्तांस किंवा दवाखान्यांत राहून जे गरीब व अनाथ लोक औषधोपचार घेत असत, त्यांना ते मदत करीत असत.

दवाखान्याकडे त्यांचें फार लक्ष असे. दवाखान्यांत जाऊन तेथील रोगग्रस्त लोकांस दया, माया आणि सहानुभूति दाखवून त्यांना यथायोग्य ते **द्रव्यसाह्य** करित असत.

तारीख २२ माहे जानेवारी इ० स० १९०१ रोजीं महाराणी विक्टोरिआ ह्या निवर्तल्यावर एडवर्ड महाराज हे गादीवर बसले. त्या वेळीं त्यांचें वय ६० वर्षांचें होतें, व त्यांच्या राज्याचें क्षेत्रफळ ११३२९००० चौरस मैल होतें. आणि उत्पन्न सुमारें २२५०००००० पौंड होतें. भूतलांतील $\frac{1}{4}$ वर ब्रिटिश राज्य आहे. त्यांच्या राज्यावर **सूर्यास्त** होत नाहीं, एवढें तें विस्तीर्ण आहे. आगगाडी, तारायंत्र आणि उत्तम प्रकारची पोष्टखात्याची व्यवस्था, हीं ब्रिटिश राज्यांत चोहोंकडे असून प्रजेस फार सुख आहे, व त्यांची दिवसेंदिवस जास्त उन्नति होत आहे.

गादीवर बसल्यानंतर त्यांनीं सातवे एडवर्ड हें नांव धारण केलें, व लागलींच राजदरबार भरवून सेंट जेम्स कोर्टांत त्यांनीं संभाषण केलें. तें असें कीं, "मीं मातोश्रीनें घालून दिलेल्या कित्त्याप्रमाणें वागण्याचा नेहमीं प्रयत्न करीन, आणि जोंपर्यंत माझ्या जिवांत जीव आहे, तोंपर्यंत मी माझ्या प्रजेचें कल्याण करीन. आणि त्यांची उन्नति होण्याचे कामीं दृढ निश्चयानें यत्न करीन. माझ्या या कठीण कर्तव्य-कर्मांत मला पार्लमेंट आणि लोक साह्य करतील असा भरवंसा आहे."

त्याप्रमाणेंच त्यांचा हिंदुस्तानास निरोप आला. त्यांतील सारांश असा "आमच्या अत्यंत प्रियकर आणि ममताळू मातोश्रींच्या दुःख-कारक निधनामुळें मी त्यांचा वारस या नात्यानें त्यांचे गादीवर बसलों आहें. हिंदुस्तानचा राज्यकारभार प्रथमतः आमचे मातोश्रींनीं हातीं घेतला, आणि त्याच्या निकट संबंधार्थ बादशाहीण हें महापद धारण केलें. त्यांचें प्रेम हिंदुस्तानावर फार होतें, तें हिंदुस्तानच्या अनेक कृत्यांत व्यक्त झालेंच आहे. त्याप्रमाणें हिंदुस्तानच्या लोकांची राज-निष्ठाही प्रगट झाली आहे. त्यांच्याच आज्ञेवरून मी हिंदुस्तान पहा-ण्यास आलों होतों, त्या वेळेस माझ्या मनावर जो चांगला ठसा उम-टला आहे, तो मी कधींही विसरणार नाहीं. त्यांच्याप्रमाणें मी-

ही हिंदुस्तानाचें कल्याण करण्याविषयीं प्रयत्न करीन; आणि तुमची जी निश्चळ राजनिष्ठा आणि ब्रिटिश तक्तावर भक्ति आहे, तीस यथायोग्य पात्र होईन."

त्यांना राज्याभिषेक करण्याचें तारीख २६ माहे जून सन १९०२ इसवीं रोजीं नक्की ठरलें होतें. त्याची सर्व सिद्धता झाली होती, देशोदेशींचे लोक, मोठमोठे राजेरजवाडे, संस्थानिक, आणि इतर असंख्य प्रसिद्ध आणि धनवान् लोक जमले होते. सार्वजनिक रस्त्यांतून लोकांची इतकी गर्दी झाली होती कीं, सहज रस्त्यांतून जाण्यास मार्ग मिळत नसे. इतक्यांत तारीख २४ जून रोजीं शहरांत राज्याभिषेकोत्सव तहकूब झाल्याचें प्रसिद्ध झालें. तेव्हा सर्व लोकांस दुःख झालें. कारण बादशाहांची प्रकृति एकाएकीं इतकी बिघडली कीं, त्यांच्या झालेल्या विकृतीबद्दल लोकांस मोठी काळजी उत्पन्न झाली. त्या विकाराचे निवारणार्थ त्यांच्या पोटावर शस्त्रक्रियेचा प्रयोग करावा लागला!

त्यांच्या आंतड्यास विकृति झाली होती, त्यावर जो शस्त्रप्रयोग करावा लागला तो दुःसह होता, म्हणून त्यांना क्लोरोफार्म द्यावा लागला. तो देण्याचे अगोदर **"मला माझे लोक क्षमा करतीलना?"** असें ते वारंवार म्हणत होते! त्यांचें कसें होईल या भीतीनें सर्व प्रजा अत्यंत काळजींत होती. आपल्या आजाराच्या योगानें राज्याभिषेकोत्सव तहकूब ठेवावा लागला. यामुळें लोकांचा मोठा "मनोभंग" झाला आहे, निराशा झाली आहे. सर्वांना आपले आजाराबद्दल अत्यंत दुःख झालें आहे, पुष्कळ सिद्धता व्यर्थ गेली आहे. हें लक्षांत आणून आपण प्रजाजनांची क्षमा मागितली पाहिजे, असें त्यांना पक्कें वाटत होतें, त्याचें हें द्योतक होय. यावरून त्यांची **प्रजाजनांविषयीं किंबहुना मनुष्यमात्राविषयीं केवढी सहानुभूति होती. किती अनिवार कळवळा हा! व केवढा हा दयाभूतपणा! हें सहज लक्षांत येईल.**

ते या दुखण्यांत इतके आजारी असतांही व त्यांना बोलण्याचें कठीण पडत असतांना त्यांनीं सांगितलें कीं, या दुखण्यानिमित्त राज्यारोहणाच्या उत्साहाच्या सगळ्या गोष्टी बंद ठेवा, परंतु गरिबांस व अनाथांस जें धर्मार्थ भोजन द्यावयाचें ठरलें आहे, तें अवश्य द्या. पुढें ढकलून गरिबांची निराशा करूं नका. असें महाराजांनीं मोठ्या आग्रहानें सांगितलें. त्याप्रमाणें **पांच लक्ष** गरिबांस तारीख २७ जून सन १९०१ इ० रोजीं यथासांग भोजन देण्यांत आलें. पुढें त्यांना तारीख ९ माहे आगष्ट सन १९०२ इ० रोजीं वेस्टमिन्स्टरआबे येथें मोठ्या समारंभानें राज्याभिषेक करण्यांत आला.

त्यांच्या राज्यारोहणानिमित्त तारीख १ जानेवारी सन १९०३ इ० रोजीं दिल्ली येथें मोठा अश्रुतपूर्व दरबार भरला होता. व्हॉइसरॉय साहेब व इतर एतद्देशीय राजे यांची मोठी मिरवणूक निघाली होती. तींत १४० हत्ती, १५० उंट, २० सोन्यारुप्याचे रथ, ४० पालख्या, १८०० अप्रतिम घोडे आणि ७००० पायदळ असा लवाजमा होता. देशोदेशींचे शेंकडों राजे आले होते, त्या सर्वांनीं आपली राजनिष्ठा अति उत्तम प्रकारें व्यक्त केली.

त्यांनीं एकंदर नऊ वर्षें राज्य केलें. या मुदतींत त्यांनीं सर्व राष्ट्रांशीं प्रवास करून स्नेह संपादन केला, आणि सर्व जगांत शांतता नांदेल असें केलें. त्यामुळें सर्व जगांत शांतता निर्माण होऊन त्यांच्या प्रजेस अत्यंत सुख झालें. त्यामुळें त्यांचें नांव इतिहासांत **जगाचे शांतता-उत्पादक अथवा "शांतिस्थापक" असें अजरामर पडलें आहे. ही त्यांची कृति सोन्याच्या मोठ्या अक्षरानें लिहून ठेवून त्यास जडावाचें कोंदण करण्यासारखी झालेली आहे, यांत शंका नाहीं.**

मागील इतिहास पाहिला असतां, इतकी शांतता स्थापन करणारे सार्वभौम बादशाह राजाधिराज कोणीच झाले नाहींत असें स्पष्ट दिसतें.

त्यामुळें त्यांचे सर्व प्रजाजन त्यांस धन्य धन्य म्हणत आहेत. आणि **"व्हिक्टोरिआ महाराणी ह्या परोपकारी आणि सातवे एडवर्ड बादशाह हे शांतिस्थापक असें सर्वत्र अत्यादरपूर्वक म्हणत आहेत."**

त्यांची स्वारी ब्यॅरिट्झ येथें गेली असतां त्यांना पडसें आलें. त्यापासून त्यांना सूक्ष्म श्वासोच्छ्वासनळीचे कफाचा आजार होऊन त्यापासून त्यांचें तारिख ६ माहे मे इ० स० १९१० रोजीं रात्रीं देहावसान झालें !!

त्यांच्या मृत्यूची वार्ता ऐकून त्यांची सर्व प्रजा अत्यंत शोकसागरांत बुडून गेली! हिंदुस्तानच्या सर्व प्रजाजनांनीं मोठमोठ्या सभा भरवून अत्यंत दुःख व्यक्त केलें, इतकेंच नव्हे, पण प्रत्यक्ष त्यांच्या नेत्रांवाटे घळघळां **दुःखाश्रु** वाहिले. आपल्या प्रभूबद्दल प्रजाजनांना इतकें अनिवार दुःख, व शोक झाल्याचें उदाहरण इतिहासांत क्वचितच सांपडेल! हाय! हाय! असे दयाळु प्रभू इहलोक सोडून गेल्यानें आमचे एक अतिउत्तम, प्रजेचे दयाळु, सुखदुःख जाणणारे **बाप**, नाहींसे झाले! यांत तिळमात्र शंका नाहीं!

त्यांचें शव तारीख १७ माहे मे इ० सन १९१० रोजीं वेस्टमिनस्टर हाल येथें मोठ्या सन्मानानें नेऊन ठेविलें. दुपारीं चार वाजतां लोकांस त्यांचें **दर्शन** व्हावें म्हणून दरवाजा उघडा केला. हजारों लोक येऊन त्यांचें दर्शन घेऊन गेले. रात्रीं १० वाजतां दरवाजा बंद केला. त्या रात्रीस पाऊस बराच पडत होता. तरीही हजारों लोक तसेच **पावसांतच** सर्व रात्रभर दरवाजा केव्हां उघडेल, आणि आम्हांस त्यांचें दर्शन केव्हां होईल, याची सारखी वाट पाहात बसले होते. दुसरे दिवशीं सकाळीं सहा वाजतां दरवाजा उघडल्यावर एकसारखा लोकांचा थवा त्यांच्या दर्शनास येत होता, व ते दिवशींही सर्व लोक रात्रभर तसेच बसले होते.

तिसरे दिवशीं तर या येणाऱ्या लोकांच्या थव्यांची लांबी ७ **मैल**-पर्यंत पसरली होती! यावरून लोकांची त्यांचेवर केवढी **मोठी राजनिष्ठावंत** भक्ति होती याचें अनुमान करावें !

त्यांचा स्मशानविधि लंडन शहरांत तारिख २० मे सन १९१० इ० रोजीं अत्यंत **सन्मानपूर्वक** झाला. खरोखर एवढी स्मशानयात्रा पूर्वीं कधीं कोणाची झालेली इतिहासांत सांपडत नाहीं, व आठवतही नाहीं. तिला सुमारें विसांपेक्षां जास्त मोठमोठे राजेरजवाडे आले होते. समाज एवढा **प्रचंड** होता कीं, तेवढा पूर्वीं कधींच जमला नव्हता. बाहेरचे लक्षावधि लोक आले होते, रस्त्यांत गर्दी मनस्वी झाली होती, मोठमोठ्या राजांनीं आपले मानपानांकडे लक्ष दिलें नाहीं. मृत्यूनंतर इतका आदरमान प्रजा आणि इतर मोठमोठे राजेरजवाडे यांनीं त्यांना दिला, यावरून त्यांचेवर किती **परम पूज्य** भक्ति होती हें चांगलें लक्षांत येईल.

त्यांनीं राज्यांत अनेक प्रकारच्या सुधारणा केल्या. ते फार **दयाळु** होते. ते मोठे, **न्यायी, चतुर** आणि **व्यवहारदक्ष होते**. त्यांस अनाथांची व रोगग्रस्तांची फार कींव येत असे. हिंदुस्थानचे प्रजेवर त्यांची फार **प्रीति** होती. त्यांचे कारकीर्दींत प्रजेस फार सुख होऊन त्यांची पुष्कळ उन्नति झाली आहे.

त्यांच्या चरित्राचा पुढील भाग लक्षांत यावा, म्हणून हें त्यांचें अल्पचरित्र येथें संक्षिप्तरूपानें दिलें आहे.

याच्या पुढील भागांत मि० **हॉलकेन**साहेब यांनीं सार्वभौम बादशाह सातवे एडवर्ड यांचें जें त्रोटक चरित्र प्रसिद्ध केलें आहे, त्यांतील मजकूर सारांशरूपानें दिला आहे.

सार्वभौम राजाधिराज सातवे एडवर्ड बादशाह यांचें चरित्र.

भाग १ ला.

शरीरसंपत्ति आणि स्वभाव.

सातवे एडवर्ड महाराज हे आपले ब्रिटिश सार्वभौम राजसत्तेचे सामाजिक थोर वैभवास तृप्त असत. ते आपला काल एकाद्या सुलतानाप्रमाणें निरुद्योगिपणांत व विलासांत, कधींही जाऊं देत नसत. म्हणून त्यांचें स्वरूप वीरश्रीयुक्त आणि शरिराचा बांधा मजबूत दिसत असे. त्यांच्या पुढील आयुष्यांत अत्यंत स्थिरता असे. त्यांच्या डोळ्यांत सतेजतेपेक्षां गांभीर्यच जास्त दिसत असे.

ज्या मोठ्या आजाराच्या योगानें त्यांचें राज्यारोहण तहकूब ठेवावें लागलें, तो आजार गेल्यावर त्यांची शरीरसंपत्ति अति उत्तम दिसूं लागली. आणि मनाची अत्यंत शांतता व त्यांत शारीरिक उत्साहाची भर, या योगें त्यांचे ठिकाणीं प्रदीप्त पाणीदारपणा दिसूं लागला.

वैद्यकीय शास्त्रावरून चांगल्या सशक्त मेंदूचें आणि चांगल्या निरोगी शरीरप्रकृतीचें जें वर्णन होईल, त्याप्रमाणें त्यांचें स्वरूप आणि शरिराचा बांधा होता.

प्रत्येक मनुष्याचें वाणीमाधुर्य त्याच्या अंतःकरणाची साक्ष देतें, त्यास अनुसरून महाराजांची वाणी मधुर असून त्यांचे अंगीं वसत असलेल्या प्रेमळ सौजन्याची साक्ष देत असे.

महाराजांचें वक्तृत्व.

जनसमूहामध्यें महाराजांची संभाषण करण्याची पद्धति, जोरदार व मनावर चांगला परिणाम करणारी असे. त्यांच्या संभाषणांत कमजोरपणा कधींही दिसून आला नाहीं. त्यांच्या व्याख्यानाची शैली जोराची असे, आणि त्यांचीं वाक्यें नेहमीं समतोल, पक्वविचारभरित, व जोरदार अशीं असत.

मोठमोठे नामांकित वक्तेही व्याख्यान देतांना गोंधळून जातात, तसा प्रकार त्यांच्या भाषणांत कधींही झाला नाहीं, हें एक मोठें आश्चर्यकारक आहे. एकादे सार्वभौम बादशाहाचे मनावर लोकांचा फार मोठा समुदाय आणि मोठे प्रसंगाचा थाटमाट पाहून कांहीं परिणाम होणें अगदीं साहाजिक आहे. आणि त्या योगानें कंठ दाटून वाणीमाधुर्यांत आणि वक्तृत्व-पद्धतींत फेरबदल होणेंही रास्त आहे, परंतु तसा प्रकार एडवर्ड महाराजांचे भाषणांत कधींही झाला नाहीं. अशा मोठ्या निकराचे लोकपरिक्षेचे प्रसंगींही त्यांच्या नाडीचा नेहमींपेक्षां

एक ठोका जास्त पडत असे, असें त्यांच्या वैद्यास आढळून आलें, हें मोठें नवल वाटण्यासारखें आहे. यांत शंका नाहीं.

यावरून असें अनुमान होतें कीं, त्यांचे अतिउच्च पदवीस शोभणारी ही जी त्यांचे ठिकाणीं इतकी विशेष मनाची शांति होती, तीच त्यांचे कुटुंबांतील मंडळीस "महाराज हे असाधारण पुरुष आहेत" असें म्हणण्यास कारणीभूत होती. असें मि० हॉलकेनसाहेब म्हणतात.

त्यांचा संवाद.

महाराजांचें बोलणें मनावर विशेष प्रकारचा चांगला ठसा उमटवीत असे. त्यांचा संवाद नाना प्रकारच्या विषयांत पूर्ण अनुभवलेल्या मनुष्याप्रमाणें असे. त्यांत जी विशेष खुबी होती, ती तितक्याच प्रमाणानें दुसऱ्या कोणत्याही मनुष्यांत कधींही दिसून आली नाहीं.

महाराज बारा शब्दांपेक्षां जास्त शब्दांचें वाक्य एका वेळेस क्वचितच बोलत असत. परंतु त्यांचें बोलणें अस्खलित असून त्याचा प्रवाह सारखा चालत असे.

मी० हॉलकेनसाहेब म्हणतात कीं—"मला त्यांच्याशीं अल्प भाषण करण्याची जी संधी मिळाली, त्यांत मी स्वतः गोष्टी सांगत असें. त्यांवर तेही उलट गोष्टी सांगत असत; परंतु सामान्य गोष्टी सांगणारांची जी पद्धति असते त्याप्रमाणें त्या नसत".

त्यांचें बोलणें मंडळींत असतांना एक क्षणभरही मंद पडत नसे. त्यांच्या बोलण्याचा विषय ज्या प्रकारची मंडळी असेल त्यांवर अवलंबून असे; ज्यांना ज्यांना त्यांच्याशीं बोलण्याचा मान मिळत असे, त्यांना रुचेल अशा अगदीं बारिक विषयाचें सुद्धां त्यांना पक्कें स्मरण व ज्ञान असे. ही इतकी तीव्र वाखाणण्याजोगी स्मरणशक्ति, जी इतर राजकीय पुरुषांना अभ्यासानें साध्य करावी लागते, ती त्यांच्या अंगीं स्वाभाविकच वसत होती.

याप्रमाणें त्यांनीं मिस्तर हॉलकेनसाहेब यांना जो अल्प भेटीचा मान दिला, त्या वेळीं ते नाट्यकला आणि विद्या या विषयांवर बोलले असें ते म्हणतात.

महाराज आणि नाट्यकला.

महाराजांस नाट्यकलेचें अप्रतिम ज्ञान होतें. मि० हॉलकेन-साहेब म्हणतात कीं, त्यांनीं एके प्रसंगीं मला एका नाट्यकलेंत प्रवीण असलेल्या इसमाची सर्व हकीगत सांगितली. ती अशी कीं, "त्याला ज्या पात्राचें काम चांगलें साजत असे, तें तो करीत नसे; लोकांच्या आवडीनुरूप तो आपल्या खेळांची योजना ठेवीत नसे. त्याचें नाटकगृह वाजवीपेक्षां जास्त मोठें होतें. आणि अशा प्रकारच्या त्यांनीं आपल्या कर्तव्यदक्षतेंत कसकशा चुका केल्या अशा प्रकारचा एक रम्य वृत्तांत त्यांनीं सांगितला".

हा वृत्तांत खरोखर आश्चर्यकारक होता. कारण इतक्या लांब अंतरावरून वस्तुपरीक्षण करण्याचा त्यांचे अंगीं हा जो अप्रतिम चाणाक्षपणा होता, त्याचें हें एक अतिउत्कृष्ट उदाहरण होय.

नाटकाचे लांब व भारी प्रयोग त्यांना रुचत नसत. नाटकाच्या काल्पनिक विषयात्मक प्रयोगांची त्यांना विशेष रुचि नसे. उलटपक्षीं त्यांना चागल्या संगीत वैचित्र्ययुक्त व तात्पर्यहीन नाटकांच्या प्रयोगांत खरा आनंद वाटत होता. त्यांना अल्प आणि चटकदार नाटकांचे प्रयोग निःसंशय आवडत असत. त्यांना रूप, सौंदर्य आणि रंगभूमीवर दिसून येणारी मनुष्यमात्रांची आनंदवृत्ति पाहण्याची आवड होती.

महाराजांचें वाचन.

महाराजांचें वाचन विशेष नसतांही त्यांना पुस्तकांची चांगली माहिती होती, आणि कोणतेंही पुस्तक त्यांना पसंत पडल्यावांचून इतर जनांना तें रुचणें कठीण होतें.

एकाद्या चांगल्या नांवाजलेल्या सार्वजनिक वर्तमानपत्रकाराचे अंगीं जशी त्वरित व तीव्र स्मरणशक्ति, व बहुश्रुतपणा असतो तसा त्यांचे अंगीं होता. आणि ते या गुणांचा अधिक जास्त प्रमाणानें उपयोग करीत असत.

सामाजिक, धार्मिक आणि राजकीय अशा कठीण विषयांच्या पुस्तकांची त्यांना विशेष जरूर लागत नसे.

म्यॉक्स बेटांत पहिल्या प्रथम मि॰ हॉलकेनसाहेब यांना त्यांच्या जवळ जाण्याचा मान मिळाला, आणि तेथें त्यांचें बोलणें त्या बेटाची भाषा, सरकार, जुने कायदे, राज्यपद्धति, लोकसंख्या, आणि पाहुण्यांची संख्या या मॅनद्वीपसंबंधाच्या विषयांवर झालें हें साहजिकच आहे. असें मि॰ हॉलकेनसाहेब ह्मणतात.

म्यॉक्सच्या बेटाची त्यांना त्या बेटांत प्रवेश करण्यापूर्वी कांहींच माहिती नव्हती, असें पक्कें दिसत होतें. दिवस मावळतांना त्यांनीं मंडळींतून जाण्याचे अगोदर मि॰ ग्ल्याडस्टन हे पूर्वी हें बेट पाहण्यास आले होते, त्यांनीं माहिती मिळविण्यांत जसें केलें तसेंच यांनींही या बेटांतील राजे यांना त्यापेक्षां धनी या नात्यानें त्यांस लागणाऱ्या प्रत्येक गोष्टींची पूर्ण पूर्ण माहिती करून घेतली. ही त्यांची ध्यानांत ठसविण्याची गति नवल वाटण्यासारखी होती.

कांहीं स्वतःचीं लक्षणें.

महाराजांची वागण्याची पद्धति नेहमीं प्रांजळ आणि संकोचविरहित अशी असे. परंतु ते आपल्या अति उच्च दर्जाचा मोठेपणा क्षणभरही जाऊं देत नसत. एडवर्ड महाराज यांचे बरोबर कोणी कधींही आपला दर्जा सोडून बोलला नाहीं.

त्यांचे जिवलग मित्रही होते. ते त्यांच्यांत व आपल्यांत असलेला फरक कधींही विसरले नव्हते. यावरून ते अलिप्त

वागत होते; असें मात्र नाहीं. उलट त्यांना मी राजा आहें, हें दाखविण्यापेक्षां मी मनुष्य मात्र आहें, हें दाखविण्यांत अत्यानंद वाटत असे.

थ्याकरे या कवींनीं "शेतकरी जार्ज" यांचे विषयीं जें वर्णन दिलें आहे, त्या कृतीप्रमाणें ते वागत नसत. परंतु आपल्या उच्च वैभवाच्या पदवीस शोभेल अशी त्यांची वागणूक होती. त्यांनीं आपल्या मॉक्स येथील दर्शनाचे वेळीं, लोकांना जवळ येऊं दिलें, व बोलण्याची मोकळीक दिली. त्या वेळीं त्यांचा चेहरा उत्साहयुक्त दिसत होता व त्याचा त्यांना उघड आनंद दिसून आला!

रामसे नांवाचें एक जवळच चिमुकलें नाना प्रकारचे रंगांनीं अलंकारयुक्त असें गांव होतें, त्याकडे बोट करून एकजण बोलला, "वाहवा! एवढ्या अवधींत एथें निशाणें, झेंडे वगैरे उभारून यास विलक्षण एकाद्या मोठ्या शहराप्रमाणें शोभविलें." "महाराज ही तर लंडन येथील राज्यारोहणाचे दिवसावरही ताण झाली आहे"! महाराज किंचित् हांसले, आणि त्यांनीं तें मोठ्या आंनदानें कबूल केलें.

ते दिवशीं त्यांचे बरोबर पोलीस वगैरे कोणीच नव्हते. संरक्षणाचे शिपाईही अगदींच थोडे होते. फक्त एक उभ्या व हलक्या टोपीनें सुशोभित दिसत असलेले सभ्य गृहस्थ आणि खलाशी घालतात तसल्या प्रकारच्या टोप्या घातलेल्या दोन सभ्य स्त्रिया, त्यांच्या स्नेहांकित मंडळींच्या त्यांचे

मागून येत असलेल्या कांहीं गाड्या, आणि त्यांच्या बाजूनें सायकलवर बसून झपाट्यानें येत असलेले कांहीं वर्तमानपत्रकार, इतकेच होते. अहाहा! त्या वेळचा देखावा मोठा मनमोहक होता! ज्या प्रजेवर महाराज राज्य करीत होते, त्याच प्रजेचें प्रेम आणि आसरा हेंच आपलें देहसंरक्षक असें त्यांनीं मानिलें. असें मानणारा दुसरा सार्वभौम राजा इतर कोणत्याही देशांत सांपडेल असें दिसत नाहीं!

"मला वाटतें महाराज आम्हीं आपणास अतिशय तसदी दिली आहे" असें मि० हॉलकेनसाहेब म्हणाले. त्यावर महाराजांनीं उत्तर दिलें कीं "तें मला फार आल्हादकारक वाटलें व त्यापासून मला अति सुख झालें आहे."

त्यांच्या ताब्यांतील म्यॉक्स बेटांत:—

महाराजांची स्मरणशक्ति ही एक त्यांस अद्भुत देणगीच होती. महाराजांबरोबर असलेल्या मंडळीपैकीं एकजण जवळचे टेंकडीवर असलेल्या स्मारकांकडे बोट करून म्हणाला कीं, "महाराज ती ऑलबर्ट हील आणि तो ऑलबर्ट टावर होय. प्रिन्स कन्सर्ट हे रामसे पहाण्यास इ० स० १८४७ त आले होते. त्या वेळेसही अशीं नांवें त्यांना दिलीं आहेत."

"ते मला अगदी पक्कें आठवतें." असें महाराज म्हणाले, "मी महाराणीसहित सुंदर नौकेंत बसलों होतों, त्या वेळेस माझें वय फक्त ७ च वर्षांचें होतें. आणि महाराणींची तब्यत नादुरुस्त होती. म्हणून मी किनाऱ्यावर आलों नाहीं."

"महाराज प्रिन्स ऑलबर्ट हे किनाऱ्यावर उतरले त्या वेळेस काय हकिगत घडली, हें कदाचित् आपणास स्मरत असेलच."

"होय तें मला आठवतें आहे. ते अगदीं अकस्मात् आले, त्यामुळें त्यांचें आगतस्वागत करण्यास तेथें कोणी नव्हतें. आणि तेथील नापीकानें त्यांना टेंकडीवर नेलें."

या इतक्या सूक्ष्म घडून आलेल्या गोष्टींचें त्यांना स्मरण होतें, यावरून आयुष्यक्रमांत ज्या मोठमोठ्या गोष्टी घडतात त्या ते कधींच विसरत नसतील हें अगदीं उघड होय.

महाराजांनीं म्यॉक्सच्या बेटांतील लोकांस हें जें दर्शन दिलें त्याची त्यांना निरंतर आठवण राहिली. त्यांनीं महाराजांचा जो इतका स्वसंतोषयुक्त, अत्यंत थाटमाटपूर्वक, उत्साहदायक, एकाद्या मोठ्या, लोकप्रिय सार्वभौम राजालाही क्वचित् लाभणारा असा आदरसत्कार केला त्याचा महाराजांना खरोखर आनंद झाला! तो दिवस सोन्यासारखा सुंदर व तेजस्वी दिसत होता. आकाश ढगविरहित असल्यामुळें दैदीप्यमान आणि लखलखीत सूर्यप्रकाश पडला होता.

महाराजांनीं राजकीय मंडळी आणि महाराज्ञी यांचे सहित त्या बेटाच्या पूर्वेकडील आणि मध्यभागांत फेरफटका केला. ते धर्माध्यक्षाच्या कोर्टाजवळ थांबले. आणि जुन्या पडक्या पिल या नांवाच्या किल्ल्यामध्यें त्यांनीं फराळ केला.

निरभ्र आकाशाखालीं, दैदीप्यमान, सूर्यप्रकाशांत चमकणारे समुद्राचे लगत त्या उंच सखल बेटांतील खडकाळ

जागेवर हें ठिकाण तेजस्वी आणि रम्य दिसत होतें. उघड्या देवळाच्या गाभाऱ्यांत मोडक्या कमानीखालीं एका टेबलावर फराळाचें सामान मांडिलें. महाराज आपल्या वनभोजनाचा उपभोग घेऊं लागले, आणि बराच वेळ बसून संवाद करित होते.

त्या वेळेस त्यांच्या उन्हानें, तप्त झालेल्या सुखरूपाकडे, आणि मजबूत शरिराच्या आकृतीकडे पाहून, ते नुकतेच एकाद्या मोठ्या दुखण्यांतून उठले असावेत, असें वाटत नसे. त्यांची ती परिपूर्ण मधुर वाणी आणि मनःपूर्वक हांसणें यावरून त्यांचे आंगीं कांहीं अशक्तता राहिली असावी असें भासत नसे.

म्यॉंक्स बेटांतील लोकांना तें सर्व फार आश्चर्य आणि आल्हादकारक वाटलें. आणि दुसरे दिवशीं सकाळीं ते झोंपेंतून उठल्याप्रमाणें डोळे चोळूं लागले. आणि अशा गोष्टी खरोखरच घडल्या कीं काय याजबद्दल विस्मय करूं लागले!

महाराजांची निरीक्षणशक्ति.

महाराजांची निरीक्षणशक्ति उत्तम कांदबरीकार बॉलझॉक यांच्यासारखी श्रेष्ठ अशी होती. मि० हॉलकेनसाहेब म्हणतात कीं, पील या नांवाच्या किल्याकडे आम्ही गाडींत बसून जात असतांना ते म्हणाले कीं "या बेटांत नेमनिष्ठ लोक बरेच असावेत असें मला वाटतें."

"होय महाराज, अशा प्रकारचे लोक खरोखरच आहेत."

"परंतु आपले लक्षांत ही गोष्ट कशी आली हें मला सांगितल्यास त्यापासून मला समाधान वाटेल."

"नेमनिष्ठ लोकाचीं जीं पुष्कळ देवालयें रस्त्यानें जातांना आपण पाहिलीं त्यांवरून मी असें म्हणतों."

हीं जीं नेमनिष्ठ लोकांचीं चुन्याचीं सफेती दिलेलीं पुष्कळशीं देवालयें होतीं, तीं लहान लहान अशीं असून धान्यसंग्रह करण्याच्या कोठडीहून निराळ्या प्रकारचीं नव्हतीं. अर्थात् तीं देवालयेंच आहेत असें ओळखून काढणें कठीण होतें.

महाराज हे साधारणरीत्या स्त्रीजातीचे फारसे मोठे परीक्षक असण्याचें कांहींच कारण नाहीं. परंतु वर जो गाडींत बसून गेल्याचा उल्लेख केला आहे, त्या समयीं रस्त्यांतून जात येत असलेली स्त्रीजाती त्यांचे अवलोकनांत आली. आणि किल्ल्यांत ज्या वेळेस कोणी एक गृहस्थ किल्ल्याच्या रखवालदाराचें उत्कृष्ट उदाहरण घेऊन म्यॅांक्स येथील राहणाऱ्या कोळी लोकांच्या जातीविषयीं वाखाणणी करूं लागला, त्या वेळेस महाराज म्हणाले कीं "तुमच्या म्यॅांक्स स्त्रियाही चांगल्या आहेत."

"परंतु बेट पाहण्यास ज्या इंग्लिश स्त्रिया पाहुण्या म्हणून आल्या असतील, त्या आपण म्यॅांक्स स्त्रियाच आहेत असें समजणें शक्य नाहीं काय?" असें मि० हॅालकेनसाहेब म्हणाले.

"असें कसें होईल? त्यांच्यात कोणता फरक आहे, हें मला माहित आहे." परोपकार करून आपल्या आयुष्यक्रमाचें चांगलें सार्थक करून घ्यावें असें महाराजांना वाटत असे. ते आपलें आयुष्य आनंदांत घालवीत असत. आणि त्यांच्या लोकप्रियतेचें हेंच एक खरें कारण होय.

"खरें, खरें, सुख ज्यास म्हणतात, त्या सर्व सुखाचे ते पूर्ण चाहते होते." त्यांना शिकार करण्यांत आणि भरधांव घोडा काढण्यांत आनंद वाटत असे.

घरगुतीसंबंध वगैरे.

महाराजांची त्यांच्या मातापित्यांशीं, कुटुंबाशीं, चिरंजीवांशीं, आणि नातवंडांशीं वागण्याची पद्धति विशेष अप्रतिम आणि प्रेमयुक्त अशा प्रकारची होती.

बाळपणांत त्यांना मात्र गृहव्यवस्थेचे नियम तीव्र वाटत असत. महाराज्ञी यांच्या उच्च वैभवांत हात घालणें त्यांना आवडत नसे.

बाप या नात्यानें ते फार कनवाळू होते. त्यांना आपल्या चिरंजीवाच्या पराक्रमाचा फार अभिमान वाटत असे. जेथें युवराज हे प्रवासास जात, तेथें त्यांच्या भाषणाचा गौरव झाल्याचें ऐकून त्यांना संतोष होत असे.

आजोबा या नात्यानें आपणांला सृष्टीच्या अद्भुत नियमाप्रमाणें पोटच्या मुलापेक्षां जशीं नातवंडेंच अधिक प्रिय वाटतात, तशीं त्यांनाही वाटत होतीं. प्रिन्स ओल्याफ् हे त्यांचे फार लाडके होते. सार्वभौमराजा आणि सेनापति होऊन मोठ्या माणसांना कवाईत शिकविणाऱ्या योद्ध्यांत त्यांची गणना करण्यांत, आणि त्यांच्या बोबड्या बोलानें आपली करमणूक करण्यांत, त्यांना फार आनंद वाटत असे.

सातवे एडवर्ड महाराज हे मोठे न्यायी असून त्यांचे ठिकाणीं तीव्र व विशाल बुद्धिमत्ता वसत होती. धर्मावर त्यांची श्रद्धा अंतःकरणपूर्वक फार मोठी होती.

सातवे एडवर्ड महाराजांनीं सर्व राष्ट्रांचा जो एक जमाव केला, तो येथें पुन्हां सांगण्याची जरूरी नाहीं. तें एक जगांत शांतता नांदविण्याचें मोठें काम होतें. परंतु तें त्यांनीं पार पाडिलें. तें धर्माचे पुरस्कर्ते या नात्यानें नसून जगांतील मोठ्या धूर्त मनुष्याप्रमाणें शेवटास नेलें. प्रजेचें कल्याण करण्याची काळजी हाच त्यांना छंद होता. त्यांचे लांबणीवर टाकलेलें राज्यारोहणाचें त्यांना मोठें संकट वाटलें, त्याप्रमाणेंच त्यांचे प्रजाजनांसही भारी दुःख जाहलें. बरे जाहल्यावर आपल्या प्रजेचीं अंतःकरणें त्यांनीं आपल्याकडे ओढून घेतलीं. त्यांच्यावर प्रजेची फार निष्ठा होती.

शांतता आणि कर्तव्यकर्म.

महाराजांनीं आपल्या प्रजेच्या कल्याणाकरितां, आणि आपल्या कर्तव्यदक्षतेकरितां, फार मोठी मेहनत घेतली. ते ठिकठिकाणीं प्रवास करित असत. कितीही प्रकृति बिघडली तरी कर्तव्यकर्मांत ते अंतर पडूं देत नसत. ब्यॉरिट्झ येथें गेले असतां त्यांची प्रकृति कशी बिघडली, हें पूर्वीं सांगितलेंच आहे, त्यामुळें ते लंडन येथील बंकिंगहाम राजवाड्यांत तारीख ६ माहे मे सन १९१० इसवी रोजीं निवर्तले. त्यामुळें त्यांची सर्व प्रजा शोकसागरांत बुडून गेली ! !



सार्वभौम महाराज्ञी आलेक्झांड्रा मातोश्री.

सार्वभौम महाराज्ञी आलेक्झांड्रा ह्यांचें जन्म इ० स० १८४४ ह्या वर्षी दिसेंबरचे १ ले तारखेस कोपेनहेगेन येथें झालें. लहानपणापासून त्या उद्योगी, धर्मनिष्ठ आणि परोपकारी आहेत. पुढें त्यांची कीर्ति चहूंकडे पसरली. सातवे एड-वर्ड महाराज हे जर्मनींत प्रवासास गेले असतां, त्यांची व महाराजांची भेट झाली. पुढें महाराजांचें त्यांचे वर प्रेम जडून, त्यांचा विवाह तारीख १० मार्च इ० स० १८६३ सालीं झाला. त्या वेळेस एडवर्ड महाराज यांचें वय बावीस वर्षांचें होतें. योग्य पती मिळाले म्हणून त्यांचा आनंद त्रैलोक्यांत मावेनासा झाला होता !

त्या मोठ्या दयाळू आहेत. गरीबांस धर्म करण्यांत त्या फार उदार आहेत. भूतदया हा त्यांचे अंगीं फार मोठा गुण आहे. त्यांची परमेश्वरी कृपेवर अत्यंत निष्ठा आहे. त्या मोठ्या भक्तिमान् आहेत. गरीबांस साह्य करणें, अनाथांस व रोग-ग्रस्तांस मदत करून त्यांचा समाचार घेणें यांत त्यांना मोठें समाधान वाटतें.

महाराणी ह्या पतिसेवेंत अत्यंत दक्ष असत. त्याप्रमाणें संसारांतही त्या फार चतुर आहेत. इ० स० १८७१ ह्या वर्षी एडवर्ड महाराजांना त्यांचे जिवावरचें दुखणें गेलें, त्या वेळेस त्यांनीं रात्रंदिवस एकसारखी त्यांची शुश्रूषा केली. एके दिवशीं त्यांची प्रकृति फार अस्वस्थ झाली. त्यामुळें सर्व मंडळीच्या तोंडचें पाणी पळालें! परंतु दुसरे दिवशीं त्यांनां किंचित् बरें वाटलें. ते दिवशीं रविवार असल्यामुळें,

तो दिवस ईश्वरोपासनेचा होता. म्हणून त्यांनीं धर्माध्यक्षास एक पत्र लिहिलें. त्यांतील सारांश येणेंप्रमाणें:–

"माझे भ्रतार यांस आज किंचित् बरें वाटत आहे; ही परमेश्वराची कृपा आहे; मी देवळास येत आहें, आपला उपदेश संपण्यापूर्वींच मला तेथून त्यांच्या शुश्रूषेकरितां परत यावें लागेल. म्हणून प्रार्थनेच्या पूर्वभागांतच आपण जर त्यांच्याविषयीं परमेश्वरास प्रार्थना कराल, तर मलाही आपणाबरोबर ईशस्तवन करण्यास बरें होईल."

हें पत्र विशेष मोठें नाहीं. तथापि तें कितीतरी भक्तियुक्त आहे बरें ? यावरून परमेश्वराचे ठिकाणीं त्यांची अत्यंत भक्ति, पतिप्रेम आणि अतिउत्तम प्रकारची कर्तव्यदक्षता चांगली व्यक्त होते.

पतीस सोडून त्या एकट्या अशा बहुतकरून कधींच राहत नसत. महाराजांच्या प्रवासांत त्या नेहमीं बरोबर असत.

महाराजांच्या निधनानंतर त्यांनीं स्वतः प्रजाजनांस एक पत्र लिहिलें आहे. तें सारांशरूपानें खालीं दिलें आहे.

"मी शोकसागरांत, आणि माझ्यानें बोलवत नाहीं अशा दुःखद स्थितींत अगदीं बुडालें आहें. यामुळें माझें हृदय शतधा विदीर्ण झालें आहे. माझ्या या दुःखद स्थितीबद्दल माझ्या राष्ट्रांतील सर्व प्रजाजनांनीं, आणि ममताळू लहानमोठ्या सर्व लोकांनीं, मजविषयीं जी इतकी सहानुभूति आणि कनवाळूपणा व्यक्त केला, त्याजबद्दल ह्या अशा दुःखद स्थितींतही मला त्यांचे आभार मानिल्यावांचून राहवत नाहीं."

"माझे प्रिय पति गेले, त्यांजबरोबर मी एकटीच सर्वस्वास मुकलें, असें नाहीं. तरी त्यांजबरोबर, सर्व राष्ट्राचा उत्तम मित्र, बाप, आणि राज्यकर्ता नाहींसा झाला आहे."

"ज्या अर्थीं, परमेश्वरास हें दुःख आम्हांस देणें बरें वाटलें, त्या अर्थीं तें सहन करण्याची शक्तिही त्यानेंच आम्हांस द्यावी. हें दुःख सर्वांत मोठें आहे, 'ईश्वरेच्छा प्रबळ आहे,' ती कधींही चुकावयाची नाहीं."

"ह्या जगामध्यें मला पुढें जें काय करावें लागेल किंवा भोगावें लागेल त्यांतून निभवण्यास मला देवानें कृपा करून साह्य करावें. म्हणून तुम्ही परमेश्वराचे प्रार्थनेंत नित्य मजविषयीं दोन शब्द बोलण्याचें स्मरण ठेवा."

"सर्वांकडून मला सहानुभूतीचीं जीं पत्रें व निरोप आले आहेत, त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानितें."

"माझा मुलगा जो आतां आपले पित्याचे गादीवर बसला आहे, त्यानें आपल्या पित्याप्रमाणेंच वागण्याचा निश्चय केला आहे, आणि तुम्ही त्याचे वडिलांवर जशी राजनिष्ठा ठेविली तशीच त्याजवरही ठेवा. अशी माझी विनंती आहे."

"तुमची निष्ठावंत भक्ति माझ्या मुलावर आणि सुनेवर दृढ बसेल अशा रीतीनें ते वागतील असें मी पूर्ण जाणून आहें."

सातवे एडवर्ड बादशाह यांचे चरित्रांतील कांहीं स्मरणीय गोष्टींचे काल.

जन्म ता० ९ नोव्हेंबर इ. स. १८४१
ख्रिस्तीधर्मदीक्षा इ. स. १८४२
लेडी लिटलटन यांना शिक्षक नेमिलें १८४७
मि० बर्च यांना शिक्षक नेमिलें १८५०
सैन्यांत कर्नलचा अधिकार दिला १८५८
यूरोप देशांतील प्रवास १८५९
कानडा देशांतील प्रवास १८६०
प्रिन्सेस आलेक्झांड्रा यांची भेट १८६१
विवाह १८६३
हिंदुस्तानची सफर १८७५
हॉस्पिटल फंडाची स्थापना १८९७
गादीवर स्थापना १९०१
पार्लमेंट खुलें केलें १९०१
राज्यारोहणउत्साहसमारंभ १९०२
राज्यकारभार (एकंदर नऊ वर्षें) १९०१ ते १९१०
ब्यारिट्झची सफर १९१०
निवर्तले ता. ६ मे १९१०

समाप्त.

3

An abridged translation of the Pen Portrait in Englisl Mr. Hall Caine (with kind permission of the Author) wit historical introduction compiled by A.B. Baride (with kind permi of the Proprietor of the monthly magazine Balbodh, to use figures